दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB · legrand · HAVELLS · INDOASIAN · Finolex · KOLORS · USHA · PHILIPS · GreatWhite · SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक १७३ वा गुरूवार दि.०७ डिसेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# हजारो आंबेडकरी अनुयायांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी महाबुद्ध वंदना संपन्न






पावसाचा व्यत्य तरीही हजारो अनुयायी उपस्थित.
लहान बालकांचिही लक्षवेधी उपस्थिती दोन तास उभे राहूनच अभिवादन.

लातूर :– प्रज्ञासूर्य, उपेक्षितांचे नायक, महामानव, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७व्या महापरीनिर्वाण दिनानिमित्त समस्त लातूरकरांच्यावतीने पु. भंतेजी पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तदनंतर पूजनीय भिक्खु संघाच्यावतीने त्रिरत्न वंदना घेण्यात आली. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली बौद्ध धम्माची आचारसंहिता म्हणजे बावीस प्रतिज्ञाचे सामूहिक वाचन करण्यात आले. भारतीय संविधानाची प्रस्तावना वाचण्यात आली. कार्यक्रमाचा समारोप सामूहिक राष्ट्रगीताने झाला. यावेळी भिक्खू पय्यानंद थेरो, भंते बोधिरत्न, भंते बुद्धशील, भंते विपसि, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, भा. ई. नगराळे, पृथ्वीराज शिरसाट, बाबासाहेब गायकवाड, बसवंतप्पा उबाळे, डॉ. विजय अजनीकर, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रा. देवदत्त सावंत, संजय सोनकांबळे ॲड. धम्मदीप बलांडे, रणधीर सुरवसे, विश्वनाथ आल्टे, उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, ज्योतीराम लामतुरे, निलेश बनसोडे, प्रा. सतीश कांबळे, अशोक कांबळे, अंतेश्वर थोटे, पांडुरंग अंबुलगेकर, राहुल शाक्यमुनी, सुमन उडानशिव, सरिता बनसोडे, शारदा लामतुरे, संगीता वाघमारे, शकुंतला नेत्रगावकर, बेबीताई कांबळे तसेच महा बुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीचे सर्व सदस्य व मोठ्या संख्येने आंबेडकर अनुयायी उपस्थित होते. यावेळी सेवानिवृत्त महार बटालियन व एनसीसी कॅडेट्स यांनी सलामी देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यु. डी. गायकवाड यांनी केले तर आभार मिलिंद धावारे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महा बुद्ध वंदना सुखानू समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त
## डॉ.बासाहेब आंबेडकर यांना अभिवादन..!

अहमदपूर :– भारतरत्न बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले. सुरुवातीला भारतीय बौध्द महासभा तालूका शाखेच्या वतीने सामूहिक त्रीशरण पंचशिल घेण्यात आले. त्यानंतर मान्यवरांची अभिवादन पर मनोगते संपन्न झाली. मतदार संघाचे आमदार बाबासाहेब पाटील यांनी बोलताना म्हटले की,महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानव मुक्तीसाठी केलेले कार्य ऐतिहासिक अशा स्वरूपाचे असून दीन दलित उपेक्षीत समाज घटकांवर त्यांचे अनंत उपकार असून या उपकाराची जाणीव ठेवने गरजेचे आहे असे सांगीतले. भाजपा प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके पाटील बोलताना म्हणाले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे युगपुरुष होते. त्यांनी इथल्या गोरगरीब लोकांना त्यांचे हक्क मिळवून दिले.बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानामूळे आपण सूखी समाधानी जीवन जगत असल्याचे प्रतिपादन केले. या प्रसंगी प्रा.डॉ.एस.के.खिल्लारे सर,भारतीय बौध्द महासभेचे तालूकाध्यक्ष प्रसाद गायकवाड, साहित्यीक वाय.डी.वाघमारे सर, शेषेराव ससाणे सर आदींनी सूध्दा आपले मनोगत व्यक्त केले.



या प्रसंगी माजी मंत्री विनायकराव पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख,नगर परिषदेचे मुख्याधिकारी काकासाहेब डोईफोडे, माजी सभापती ॲड.भारत चामे, डॉ.ओ.एल.किनगांवकर,बाबासाहेब कांबळे, लक्ष्मीकांत बनसोडे, अण्णाराव सूर्यवंशी, रामनाथ पलमटे,संजय माने,रवी महाजन, डॉ.शादूल पठाण, अजहर बागवान,पोलिस उपनिरीक्षक दिपक सूर्यवंशी,सूर्यकांत कोकाटे,बालाजी शिंदे,फेरोज शेख, अफरोज शेख यांनी सूध्दा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.दूगाने सर यांनी केले.तर या कार्यक्रमाचे आभार संयोजक तथा पुतळा समीतीचे सचिव डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष,रिपाई नेते तालूकाध्यक्ष अरूणभाऊ वाघंबर,शाहीर साबळे, संतोष गायकवाड, डॉ.बालाजी थिट्टे ,अजय भालेराव, भिमराव कांबळे, गणेश मुंडे, आदित्य भालेराव,पवन भालेराव, प्रविण गायकवाड, राहुल गायकवाड शिवाजीराव भालेराव आदींनी पुढाकार घेतला. या प्रसंगी विविध पक्षाचे सामाजिक,राजकीय पक्षांचे नेते कार्यकर्ते यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनी पानगाव येथील बाबासाहेबांच्या अस्थींना जिल्हाधिकारी यांनी केले अभिवादन




लातूर :– भारतरत्न, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पानगाव येथे त्यांच्या जतन केलेल्या अस्थिंचे लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर –घुगे, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय मुंढे यांनी अभिवादन केले.

आज सहा डिसेंबर हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिनी देशभर अभिवादन केले जाते. मुंबई येथे चैत्यभूमीवर राज्यपाल,मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री यांच्यासह लाखो लोकांनी अभिवादन केले. पानगाव येथेही दरवर्षी महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी ठेवलेल्या असल्यामुळे हजारो लोकं अत्यंत श्रद्धेने येथे येऊन अभिवादन करतात. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर– घुगे, पोलीस अधिक्षक सोमय मुंढे यांनीही यावेळी अभिवादन केले. येथे येणाऱ्या लोकांच्या सोयसुविधे बद्दलही प्रशासनाला योग्य त्या सूचना दिल्या.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

### ऑल इंडिया सीपीडब्ल्यूडीएससी/एसटी असोसिएशन यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन



मुंबई :– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आज मुंबईत आयोजन करण्यात आले. मुंबईतील प्रतिष्ठा भवन येथे सकाळी साडे एकर वाजता श्री सुरेंद्र राव जाधव यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. असोसिएशनचे अध्यक्ष श्री रमेश निनावे आसनी सचिव किरण अंभोरे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होते. तसेच श्रीमती रेखा कांबळे, श्री अशोक कांबळे, श्री सिद्धार्थ जगताप, श्री नंदू बोराडे, श्री निशांत भागात, श्री अनिल निकम, श्री एम रंगराव, श्री विक्किलास खैरे, श्रेमती माधुरी कांबळे, श्रद्धा मेश्राम, श्री शशिकांत मोरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. मेघराज चावडा यांनी केले अभिवादन

लातूर :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील सर्जरी विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे अध्यक्ष डॉ. मेघराज चावडा यांनी अभिवादन केले. यावेळी महेंद्र कांबळे, ड.धम्मदीप बलांडे,अविनाश जाधव,विकास दंडे,शेख जावेद, अशोक कांबळे,राहुल गायकवाड ,परमेश्वर कांबळे ,सचिन मंडाले डॉ.विठ्ठल धाकडे,पप्पु होळकर ,सतीष सरवदे,ऊत्तम कांबळे अनिल कांबळे, सुबोध कवठेकर, हानुमंत लोंढे, प्रेम वाघमारे, विघासागर कांबळे, मिथुन कांबळे हारिश टेकाळेआदी उपस्थित होते



## संपादकीय....

# अहंकाराचे वारे!

राजकारणात मुख्य ध्येय गाठण्यासाठी काही लवचिकता ठेवावी लागते. पण हे भान विसरून पक्षीय आणि वैयक्तिक अहंकारच डोके वर काढत अहेत.राजकारणात मुख्य ध्येय गाठण्यासाठी काही लवचिकता ठेवावी लागते. पण हे भान विसरून पक्षीय आणि वैयक्तिक अहंकारच डोके वर काढत अहेत.मध्य प्रदेश, राजस्थान तसेच छत्तीसगड या हिंदी भाषिक पट्ट्यातील तीन राज्यांवर भारतीय जनता पक्षाने कब्जा केल्यानंतरच्या अवघ्या ४८ तासांत 'इंडिया' या विरोधकांच्या आघाडीतील दुराव्याची दरी अधिकच रुंदावत चालल्याचे चित्र उभे राहिले. पाच राज्यांतील विधानसभा निकाल आणि चार महिन्यांवर येऊन ठेपलेल्या लोकसभा निवडणुका यांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसअध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या आघाडीची बैठक बुधवारी आयोजित केली होती.मात्र, 'आपण या बैठकीस जाणार नाही!' असे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारीच जाहीर केले होते. आता समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव आणि संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष व बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनीही या बैठकीकडे पाठ फिरवली. याचा अर्थ स्पष्ट आहे.या तिन्ही राज्यांत काँग्रेसने याच 'इंडिया' आघाडीतील अन्य काही पक्षांशी काही मोजक्या जागांसाठीही तडजोड करण्यास नकार देत 'एकला चलो रे...' अशी भूमिका स्वीकारली होती. ही भूमिका आडमुठेपणाची जशी होती, त्याचबरोबर कर्नाटकात दणदणीत विजय मिळवल्याने एकदम अंगात शिरलेल्या अहंकाराच्या वाऱ्याचे दर्शन घडवणारी होती.

अखिलेश यांनी वाराणसीतील एका कार्यक्रमात बोलताना 'आता निकाल आल्यामुळे अहंकाराचे वारेही उतरले असणार!' असे उपरोधिक उद्गार काँग्रेसचे नाव न घेता काढले होते. खरे तर ममतादीदींनी यापूर्वी काँग्रेसच्या जातनिहाय जनगणनेला पाठिंबा देण्याच्या काँग्रेसच्या निर्णयाला विरोध करून आघाडीतील मतभेदांना तोंड फोडले होतेच. आता तर त्यांनी थेट या बैठकीकडेच पाठ फिरवली आहे.नितीश कुमार यांनी तर खर्गे यांनी त्यांना केलेल्या फोनवरच बैठकीसाठी येण्याची असमर्थता व्यक्त केली. मात्र, बिहारमधील नितीश कुमार यांच्यासमवेत सत्तेत सहभागी असलेल्या राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव हे मात्र खर्गे यांच्या बैठकीस जातीने उपस्थित राहणार होते. तर अखिलेश बहुधा आपले काका रामगोपाल यादव यांना या बैठकीस धाडतील, अशी चिन्हे होती. आता बैठक लांबणीवर पडल्याने पुढे किती फाटे फुटतात, हे पाहावे लागेल.या तीन राज्यात आलेल्या अपयशामुळे या आघाडीतील काँग्रेसची पत कशी घसरली आहे, त्यावरच या बहिष्कारसत्रामुळे शिक्कामोर्तब झाले असले तरी त्यामुळे या आघाडीचे नेतृत्व कोणी करायचे, हाच प्रश्न आता आ वासून उभा राहिला आहे. नितीश असो की ममतादीदी, या दोघांनीही आघाडीचे नेतृत्व करण्याची महत्त्वाकांक्षा कधीच लपवून ठेवली नव्हती आणि काँग्रेस आघाडीत घेऊ पाहत असलेली 'मोठ्या भावा'ची भूमिका तर कोणासच मान्य नव्हती.मात्र, काँग्रेसचा या तीन राज्यांत जबर पराभव घाला असला तरी या पक्षाने प्रत्येक राज्यात ४० टक्क्यांच्या आसपास मते घेतली आहेत, याकडे आघाडीतील अन्य पक्षांनी दुर्लक्ष करणे, त्यांना परवडणारे नाही. तसे करणे हेही एका अर्थाने अहंकारी वृत्तीचेच दर्शन घडवणारे असेल. त्यामुळे या आघाडीतील सर्वच पक्षांनी आता सामंजस्य तसेच सामोपचार या दोन मंत्रांचा जप करतच लोकसभा निवडणुकीला तोंड देणे, हेच त्यांच्यासाठी हिताचे ठरणार आहे.पुन्हा येणार.. पुन्हा येणार! एकीकडे 'इंडिया' आघाडीतील मतभेद अशा रीतीने चव्हाट्यावर येत असताना, महाराष्ट्रातील सत्ताधारी 'महायुती'तही सारे काही आलबेल नाही, असेच चित्र गेल्या चार-सहा दिवसांत उभे राहिले आहे. प्रथम शिवसेना आणि पुढे राष्ट्रवादी काँग्रेस या दोन राज्यांतील मोठ्या पक्षांत फूट पाडून भाजपने सत्ता मिळवली खरी; पण त्याची किंमत त्यांना मुख्यमंत्रिपदावर पाणी सोडून चुकती करावी लागली आहे.तेव्हाच भाजपचे राज्यातील बडे नेते यांनी 'हा निर्णय आम्ही छातीवर दगड ठेवून स्वीकारला आहे,' अशी खंत जाहीरपणे बोलून दाखवली होती. मात्र, तीन राज्यांत मोठा विजय मिळवताच भाजप नेत्यांना लगेचच स्फुरण चढले असून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भंडाऱ्यातील एका कार्यक्रमात बोलताना, २०२४ मध्ये पुन्हा देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील, असे जाहीरपणे कार्यकर्त्यांकडून वदवून घेतले.तर त्यानंतरच्या काही तासातच सरकारमध्ये सामील असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी '२०२४ मध्ये अजित पवार हेच मुख्यमंत्री असतील!' अशी दवंडी पिटली. त्यामुळे एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस-अजित पवार यांच्या या तीन इंजिनांच्या सरकारात कशा प्रकारची 'एकवाक्यता' आहे, तेच पटलावर आले! त्याचवेळी जवळपास २०० आमदारांच्या पाठिंब्यावर उभे असलेले हे सरकार शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांतील फुटीर आमदारांच्या अपात्रतेची सुनावणी सुरू असल्याने अधांतरीच असल्याचे जनतेला कळून चुकले आहे. शिवाय, शिवसेना तसेच 'राष्ट्रवादी' या दोन्ही पक्षांतील फुटीनंतर तर मूळ पक्ष कोणाचा या वादाने तर शिग गाठली असून, त्यास नळावरील भांडणाचे स्वरूप आले आहे.गेल्याच आठवड्यात अजित पवार यांनी केलेले कथित गौप्यस्फोट आणि त्यास शरद पवार यांनी दिलेला 'करारा जवाब' यामुळे नेमके खरे कोणाचे, असा प्रश्न केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर अवघ्या देशाला पडला आहे. मात्र, आता या तिन्ही पक्ष-गटांची खरी कसोटी लोकसभेतील जागावाटपाच्या वेळी लागणार आहे; कारण भाजप आता लोकसभेच्या जास्तीतजास्त जागांवर दावा करणार हे उघड आहे.त्याचवेळी भाजपच्या या ताज्या यशामुळे मोहरून गेलेल्या मुख्यमंत्री शिंदे यांनी 'मिशन ४८'चा नारा दिला आहे. या अशा घोषणाबाजीच्या गदारोळात कारभाराकडे कुणाचे लक्ष आहे का, हा प्रश्न मात्र अनुत्तरितच आहे.

# एक स्वप्नच ठरू नये: विमानाने उड्डान!

(विश्व नागरी उड्डाण दिन.)

हा जगभरातील वाहतूक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग झाला आहे. आज ७ डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिन आहे. एका शहरातून दुसऱ्या शहरात किंवा एका देशातून दुसऱ्या देशात जाण्यासाठी हवाई प्रवास हा एक वेगवान आणि आरामदायी मार्ग आहे. मात्र आजही जगभरातील अनेक गरीब देश किंवा विकसनशील देशांतील अनेकांसाठी हवाई प्रवास हे एक स्वप्नच आहे. अर्थात देशातील अनेक छोट्या शहरांना हवाई प्रवासासाठी जोडण्यासाठी उडान योजना राबवण्यात येत आहे. जगभरातील सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी नागरी उड्डाणाचे महत्त्व अधोरेखित करत २०१३ पासून हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. अर्थातच जरी ७ डिसेंबर २०१३ आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिन पहिल्यांदा साजरा करण्यात आला असला तरी याचे इतिहासाशी जुने नाते आहे.

हवाई प्रवासाच्या क्षेत्रात सुरक्षा आणि सावधगिरी यांना चालना देण्यासाठी या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण संघटना किंवा संस्थांमध्ये अधिक जागरुकता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिनाचे महत्त्व आहे. जगभरातील मानकांसाठी आयसीएसओ ही हवाई प्रवासातील सुरक्षेसाठीच्या आंतरराष्ट्रीय मानकांसाठी काम करते आणि ही संस्था संयुक्त राष्ट्रसंघाचाच एक भाग आहे. ७ डिसेंबरलाच आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिन साजरा केला जाण्यामागे १९४४मध्ये शिकागोमध्ये याच दिवशी इंटरनॅशनल सिव्हिल एव्हिएशन करारावर सह्या होणे हे आहे. नागरी उड्डाण प्रकरणांमध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि एकजिनसीपणा साधण्यासाठी ७ डिसेंबर १९४४ला इंटरनॅशनल सिव्हिल एव्हिएशन ऑर्गनायझेशनची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाणाचे सामाजिक आणि आर्थिक विकासातील महत्त्व यासंदर्भात जागरुकता निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. इंटरनॅशनल सिव्हिल एव्हिएशन ऑर्गनायझेशन अनेक जागतिक संघटनांसोबत मिळून काम करते. यामध्ये जागतिक मोसम विभाग, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना, युनिव्हर्सल पोस्टल युनियन, जागतिक आरोग्य संघटना आणि संयुक्त राष्ट्रसंघ इत्यादींचा समावेश आहे. देशातील अधिकाधिक भागात हवाई सेवा पोहोचावी यासाठी केंद्रातील मोदी सरकारने उड्डान योजना आणली. या योजनेअंतर्गत हवाई सेवा लहान शहरांमध्ये सुरू करण्यात येत आहे. या दिशेने एक पाऊल पुढे जात सरकारने नवीन विमानतळ, हेलिपॅड आणि नवीन हवाई मार्ग सुरु करण्याची घोषणा केली आहे. मोदी सरकारची ही नवी विमान वाहतूक सुधारणा आहे. योजनेनुसार ५ विमानतळ गुजरातमधील केशोद, झारखंडमधील देवघर, महाराष्ट्रातील गोंदिया आणि सिंधुदुर्ग याशिवाय उत्तर प्रदेशातील कुशीनगरमध्ये बांधले जातील. हिमाचल प्रदेशातील शिमला, मनाली, मंडी आणि बद्दी याशिवाय उत्तराखंडमधील हल्दवानी आणि अल्मोडा येथे हेलिपॅड बांधले जातील.

आईसीएओच्या ५०व्या वर्धापन दिनानिमित्त सन १९९४मध्ये आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिनाची सुरूवात करण्यात आली. सन १९९६मध्ये त्याच्या पुढाकारानंतर आणि कॅनडाच्या सरकारच्या मदतीने, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने अधिकृतपणे या दिवसाला संयुक्त राष्ट्र प्रणालीमध्ये आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिन म्हणून मान्यता दिली. आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण दिनाचे उद्दिष्ट राज्यांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाणाच्या महत्त्वाविषयी जगभरात जागरुकता निर्माण करणे आणि त्यांना बळकट करणे तसेच खरोखर जागतिक जलद पारगमनामध्ये योगदान देणे आणि राज्यांना मदत करण्यात आईसीएओची अनोखी भूमिका आहे, याची जाणीव करून देणे हे आहे. युनायटेड नेशन्स आणि जगातील राष्ट्रे आता अजेंडा २०३० स्वीकारत असून, जागतिक शाश्वत विकासाच्या नव्या युगाची सुरुवात करत असताना, जागतिक कनेक्टिव्हिटीचे इंजिन म्हणून विमानचालनाचे महत्त्व शिकागो शिखर परिषदेच्या उद्दिष्टांशी कधीही जास्त सुसंगत नव्हते. आंतरराष्ट्रीय उड्डाण म्हणून पाहिले जाते.

विमान वाहतुकीबद्दल काही आश्चर्यकारक तथ्ये जी तुम्हाला कदाचित माहीत नसतील. १) जगातील सर्वात जुनी एअरलाइन म्हणजे रॉयल डच एअरलाइन्स आहे. त्याची स्थापना सन १९१९मध्ये झाली आणि त्याचे पहिले उड्डाण १७ मे १९२० रोजी एमस्टरडॅम आणि लंडन दरम्यान झाले. २) भारतातील सर्वात जुनी एअरलाइन टाटा एअरलाइन्स आहे, जी सन १९३२मध्ये जेआरडी. टाटा यांनी स्थापन केली आणि सन १९४६मध्ये एअर इंडिया बनली. ३) पायलट आणि सह-वैमानिक समान अन्न खात नाहीत, कारण जर एखाद्याला अन्नातून विषबाधा झाली तर दुसरा विमान उडवू शकतो. ४) सन १९८७मध्ये अमेरिकन एअरलाइन्सने त्यांच्या प्रथम श्रेणीतील ग्राहकांच्या सॅलडमधून १ ऑलिव्ह काढून ४०,००० वाचवले. ५) सन २०१५मध्ये जगातील नागरी विमान वाहतूक ताफ्यात २७,३५२ विमाने होती. ६) जगातील विमान कंपन्यांनी सन २०१५मध्ये एकूण ४.१ ट्रिलियन प्रवासी-मैलांसाठी ३.५ अब्ज लोकांची वाहतूक केली. ७) पहिले नियोजित व्यावसायिक विमान उड्डाण १ जानेवारी १९१४ रोजी फ्लोरिडा बे ते सेंट पीटर्सबर्ग ते टॅंपा येथे झाले. ८) सरासरी फक्त २५ टक्के ग्राहक फर्स्ट क्लाससाठी पूर्ण भाडे देतात, तर बाकीचे दैनंदिन फ्लायर्स, एअरलाइन कर्मचारी किंवा अपग्रेडर असतात. ९) सरासरी, व्यावसायिक उड्डाणाचा वेग ८०० किमी/तास असतो. १०) विमानातील ऑक्सिजन मास्क सुमारे १५ मिनिटे ऑक्सिजन ठेवू शकतात.

दि.७ डिसेंबर १९४४रोजी शिकागोमध्ये आंतरराष्ट्रीय नागरी हवाई परिषद झाली होती. त्यानंतर सन १९९६मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने या दिवशी आंतरराष्ट्रीय नागरी हवाई दिवस साजरा करण्याची घोषणा केली. हवाई सेवांमध्ये सुधारणा, संरक्षण, मार्गांची निश्चिती, परिवहन आदी व्यवस्थेत आणखी सुधारणा करणे, हा या दिवसाचा उद्देश होता. त्यामुळे जगभरातील विमानतळांवरील कर्मचारी, व्यवस्थापन आणि हवाई वाहतूक नियंत्रण- एटीसी साठीदेखील हा दिवस महत्त्वाचा असतो. या दिवशी आणखी एक महत्त्वाची घटना घडली होती. क्वांटस एअरलाइन्सच्या विमानातील वैमानिक आणि क्रू सदस्यांनी शर्थीचे प्रयत्न करून ४४९ प्रवाशांचे प्राण वाचवले होते.

जगातील सर्वात उंच चार एटीसी टॉवर्स आशियात- थायलंड, मलेशिया, जपान, चीन हे असून तीन अमेरिकेत आहेत. रॉयल डच ही सर्वात पहिली एअरलाइन असून १९१९ मध्ये तिची सुरुवात झाली होती. दि.१७ मे १९२० रोजी या एअरलाइनच्या पहिल्या विमानाने एम्स्टर्डमहून लंडनच्या दिशेने प्रयाण केले होते. त्यानंतर क्वांटस (१९२०) एअरलाइन सुरू झाली. बोइंग ७४७-४०० एसच्या कॉकपिट विंडो फ्रेमचा खर्च एका लक्झरी कारच्या खर्चाएवढा आहे. त्याची वायरिंग २८० किमी लांबीची असते. अलास्का एअरलाइनने सर्वप्रथम १९९९मध्ये ऑनलाइन चेक इन सेवा सुरू केली. विमानाचा वैमानिक आणि सहवैमानिकाला वेगवेगळे भोजन दिले जाते. विषबाधा झाल्यास यापैकी एक जण तरी विमान सांभाळू शकेल, हे यामागील कारण. चीनमधील काम्दो-बांग्दा येथील धावपट्टी जगात सर्वात लांब (५.५ किमी) असून ती तिबेट क्षेत्रात येते. त्यानंतर रशिया व फ्रान्सचा क्रमांक लागतो. १ जानेवारी १९१४ रोजी अमेरिकेत पहिल्या व्यावसायिक प्रवासी विमानाचे उड्डाण फ्लोरिडा बेपासून टेंपा येथील सेंट पीटर्सबर्गकडे झाले होते. २०१५मध्ये जगातील सहाव्या सर्वात व्यग्र विमानतळाचा मान लंडनमधील हिथ्रो विमानतळाला मिळाला. त्यापूर्वी टोकियो, शिकागो, दुबई, बीजिंग आणि अटलांटाचा क्रमांक लागला. लंडनहून पॅरिसकडे जाणाऱ्या विमानात १९१९मध्ये सर्वप्रथम नाष्ट्यासाठी रोख घेतली गेली. एअर पोर्ट हा शब्द पूर्वी १७८०मध्ये जहाज व्हेंटिलेशनसाठी तयार केलेल्या जागेसाठी किंवा छिद्रासाठी वापरला जात असे. सन १९०२मध्ये हा शब्द सर्वप्रथम विमानांसंदर्भात वापरला गेला, हे विशेष! !! जागतिक नागरी हवाई दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

*************

– संकलन –

श्री एन.कृष्णकुमार जी. गुरुजी.
गडचिरोली, फक्त मधुभाष–
७७७५०४१०८६.

# डॉक्टर बाबासाहेबांचा अंतिम दिवस ५ डिसेंबर १९५६.

तो चांगला योगायोग होता की, श्री नानक चंद रत्तू जी त्यांच्या मृत्यूपूर्वी १९९९ ते २००० दरम्यान इंदरपुरी नवी दिल्ली येथील माझ्या निवासस्थानी मला भेटायला यायचे. त्यांच्याशी झालेल्या भेटीत मी कुतूहलाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आठवणी विचारत होतो, कारण शेवटच्या श्वासापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सोबत असणारी ती व्यक्ती होती.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा ५ डिसेंबर १९५६ हा आयुष्याचा शेवट चा दिवस होय, त्यामुळे मला त्या दिवशीच्या घटनांबद्दल अधिक जाणून घेण्याची उत्सुकता होती. त्या आठवणींना उजाळा देताना श्री. रत्तूजी भावूक होत असत, डोळ्यातून अश्रू ओघळत असत. ५ डिसेंबर आणि ६ डिसेंबर १९५६ रोजी दिवसभर काय घडले ते त्यांनी विस्तारपूर्वक सांगितले. वाचकांच्या माहितीसाठी त्यांनी जे मला सांगितले ते मी येथे वर्णित करू इच्छितो.५ डिसेंबर १९५६ रोजी जैन समाजाचे शिष्टमंडळ डॉक्टर बाबासाहेबांना २६,अलिपुर रोड,नवि दिल्ली येथे भेटायला आले. डॉक्टर बाबासाहेबांची तब्येत बरी नव्हती,त्यामुळे ते जैन शिष्टमंडळाला भेटायला तयार नव्हते, तथापि, नानकचंद रत्तूने त्यांना आठवण करून दिली की ही भेट पूर्वनियोजित आहे. अनिच्छेने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर त्यांना भेटायला आलेत. योग्य अभिवादन केल्यानंतर, बुद्ध धम्म आणि जैन धर्म यांच्यातील समानतेवर विस्तृत चर्चा झाली.डॉक्टर आंबेडकरांची जैन धर्माविषयीची व्यापक माहिती ऐकून शिष्टमंडळाला खूप आनंद झाला. त्यांनी 'श्रमण संस्कृती की दो धारायें' हे हिंदीतील एक पुस्तक त्यांना भेट दिले. ते निघून गेल्यावर नानकचंद रत्तू यांनी बाबासाहेबांच्या डोक्यावर तेल मालिश करण्यास सुरुवात केली. मंद मंद आवाजात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धं शरणं गच्छामि।धम्म शरणं गच्छामि। संघं शरणं गच्छामि गायला सुरुवात केली. नंतर रत्तू ना बाबासाहेबांनी हिंदी गाणे वाजवायला सांगितले. बाबासाहेब श्री रत्तु कडून होत असलेली तेल मालिश आणि हिंदी गाण्यांचा आनंद घेत होते.सेवक सुदामाने रात्रीच्या जेवणाची दोनदा माहिती दिली. बाबासाहेब रत्तूच्या खांद्यांवर हात ठेवून डायनिंग टेबल पर्यंत आलेत. ते म्हणालेत, मी थोडा भात घेईन. जेवण आटोपल्या नंतर त्यांनी एका हाताने रत्तु च्या खांद्याचा आधार घेतला आणि दुसर्या हाताने चालण्याची काठी धरून पुस्तकांनी भरलेल्याअभ्यासाच्या टेबल पर्यंतआलेत.त्यांनी मोठी लोखंडी पेटी उघडली, फाउंटन पेन घेतला, काही पुस्तके काढली आणि रत्तु ना त्याच्या झोपण्याच्या बेड जवळ ठेवण्यास सांगितले. बाबासाहेबांनी सर्व पुस्तकांकडे एक नजर टाकली. नानकचंद रत्तूला पाय दाबायला सांगितले. रात्रीचे ११.३० वाजले होते,श्री रत्तू ना पण त्यांच्या घरी जाणे असल्याने मोठ्या धाडसाने घरी जाण्यासाठी परवानगी मागितली. श्री नानक रत्तु ने पुढे सांगितले की सकाळीच बाबासाहेबांची गाडी सोबत ड्रायव्हर आणि सुदामा माझ्या घरी आलेत. त्यांना पाहून मला काहीतरी गडबड आहे याची कल्पना आली. ड्रायव्हर आणि सुदामा यांनी रडायला सुरुवात केली आणि म्हणालेत ,रत्तू साहब हमारे बाबा इस दुनिया मे नही रहे. माझ्या डोळ्यासमोर अंधार पसरला. आम्ही तातडीने २६ अलीपुर रोड बंगल्यावर आलोत. डॉक्टर माईसाहेब आंबेडकर माझी वाट पाहत होत्या. आम्ही दोघांनीही बाबासाहेबांच्या खोलीत प्रवेश केला. डॉक्टर बाबासाहेब शांत निद्रावस्थेत होते. बाबासाहेब येवढ्या लवकर आम्हा सर्वांना सोडून जातील ही कल्पनाही माझ्या मनात रात्री बंगला सोडताना नव्हती. पूर्ण पृथ्वी माझ्या डोळ्यासमोरून फिरत होती, काय करावे सुचेनासे झाले. डॉक्टर माईसाहेब म्हणाल्या सर्वप्रथम ही बातमी –श्रश्र खपवळर ठरवळे वर द्यावी म्हणजे सर्वांना कळू शकेल. मी कार घेवून आकाशवाणी भवन गाठले, बातमी प्रसारित झाली. अनेक लोकांचे फोन यायला सुरुवात झाली. प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भेट देवून श्रद्धांजली वाहिली. डॉक्टर बाबासाहेबांचे प्रेत मुंबई येथे विमानाने नेले आणि दादर स्मशान भूमीत अंतिम संस्कार झालेत.डॉक्टर आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल

माझे बरेच नातेवाईक आणि मित्रमंडळी दिल्लीला आल्यावर विचारतात कि दिल्लीला काय पाहण्यासारखे आहे. मी त्यांना सांगतो कि दिल्लीची सुरुवात डॉक्टर आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल २६, अलीपूर पासून करावी. ज्यांनी –ज्यांनी या स्थळाला भेट दिली, त्यांनी सांगितले कि आयुष्यात एकदा तरी प्रत्येकाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण स्थळाला भेट द्यावी. डॉक्टर बाबासाहेब यांचे महापरिनिर्वाण २६,अलिपुर रोड,नवि दिल्ली येथे झाल्याने हे स्थळ अगाध श्रद्धेचे स्थळ आहे. या जागेवर दिल्लीतील सुंदर पर्यटन स्थळ डॉक्टर आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल बनलेले आहे.

या जागेचा थोडासा पूर्व इतिहास.

१९४२ पर्यंत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि सामाजिक चळवळ प्रामुख्याने महाराष्ट्रात होती. त्यांची व्हाईसरॉय कौन्सिलचे सदस्य म्हणून २० जुलै १९४२ मध्ये नियुक्ती करण्यात आली, त्यानंतर त्यांनी सामाजिक, राजकीय कार्याला प्रामुख्याने दिल्लीवरून सुरुवात केली आणि ६ डिसेंबर १९५६ पर्यंत म्हणजे शेवटच्या श्वासापर्यंत ते भारताची राजधानी दिल्लीत वास्तव्य होते. ते शासकीय निवासस्थानी प्रथम २२ पृथ्वीराज रोड आणि नंतर १ हार्डिंग अव्हेन्यू येथे राहत होते. हिंदू कोड बिलाच्या मुद्द्यावरून मंत्रिमंडळातून २७ सप्टेंबर १९५१ रोजी त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. राजीनामा दिल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १, हार्डिंग अव्हेन्यू, नवी दिल्ली येथील त्यांचा बंगला रिकामा केला जेथे ते स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री म्हणून राहिले आणि नंतर त्यांनी २६, अलीपूर रोड, नवी दिल्ली येथे सिरोहीच्या महाराजांच्या १० खोल्यांचा बंगल्यात वास्तव्य सुरू केले आणि तेथे ६ डिसेंबर १९५६ रोजी शेवटच्या श्वासापर्यंत राहिलेत. २६ अलीपूर रोड हे निवासस्थान महत्त्वाचे बनले कारण येथेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध आणि कार्ल मार्क्स आणि बुद्ध आणि त्यांचा धम्म अशी दोन उल्लेखनीय पुस्तके लिहिलीत आणि इतर महत्त्वाच्या पुस्तकांची हस्तलिखितेही लिहिली गेली.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या निधनानंतर हा बंगला मदनलाल जैन यांनी खरेदी केला होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर, डॉ, सविता आंबेडकर यांना दोन खोल्या ठेवण्याची परवानगी देण्यात आली होती. डॉक्टर बाबासाहेबांच्या जाण्यानंतरही डॉ सविताबाई आंबेडकर त्या बंगल्यात आणखी ११ वर्षे राहिल्या. १९६७ मध्ये जैन यांनी डॉक्टर सविता आंबेडकर यांना बेदखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आणि अतिरिक्त भाडे नियंत्रकाने १७ जानेवारी रोजी बेदखल करण्याची नोटीस बजावली. २० जानेवारी रोजी डॉ. सविता आंबेडकर जेव्हा दिल्लीबाहेर राजस्थानमधील अलवरला गेली तेव्हा मालकाने जबरदस्तीने परिसर उघडला, दोन खोल्या रिकाम्या केल्या आणि सर्व सामान काढून बाहेर ठेवले होते ,त्यात बाबासाहेबांनी लिहिलेली अनेक कागद पत्रे होती. रात्रभर झालेल्या पावसामुळे ही कागदपत्रे, पुस्तकांची हस्तलिखिते, भाषणे यांचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले. त्यानंतर ही जागा जिंदल कुटुंबाने विकत घेतली. जागेचे नवीन मालक असलेल्या जिंदल कुटुंबाने मूळ इमारत पाडून नवीन निवासस्थान बांधले, अनौपचारिकपणे या बंगल्याला जिंदल कोठी असे म्हणत.१९५६ पासून हे ठिकाण स्मारक म्हणून घोषित करण्याची मागणी डॉक्टर आंबेडकरांच्या समर्थकांकडून केली जात होती. १९९१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त जिंदल कुटुंबीयांकडून जागा ताब्यात घेण्याच्या मागणीला नवी गती मिळाली. मार्च १९९२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा प्रचार करण्यासाठी केंद्र सरकारने डॉ आंबेडकर फाउंडेशनची स्थापना केली. १९५६ ते २००३ या ४७ वर्षात कोणत्याही सरकारने हा बंगला ताब्यात घेऊन राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले नाही. मात्र, ही जागा कोठीसहित विकत घेवून डॉ. आंबेडकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण स्थळ, २६, अलीपूर रोड येथे २ डिसेंबर २००३ रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपेयी यांनी राष्ट्राला समर्पित केले. २०११ मध्ये तत्कालीन प्रधानमंत्री डॉक्टर मनमोहन सिंग यांनी एका उच्चस्तरीय समितीला नवीन स्मारकावर काम करण्याचे निर्देश दिले. समितीने २०१२ मध्ये आपला अहवाल सादर केला आणि २०१३ मध्ये हे काम केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपवण्यात आले. २१ मार्च २०१६ रोजी प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांचेहस्ते डॉक्टर आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल ची पायाभरणी करण्यात आली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला १३ एप्रिल २०१८ रोजी प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी २६, अलीपूर रोड, नवी दिल्ली येथे डॉ. आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियलचे उद्घाटन करून राष्ट्राला समर्पित केले.

आपल्या राज्यघटनेचे शिल्पकार असलेल्या आपल्या महान व्यक्तीचा इतिहास जाणून घेण्याचे ठिकाण म्हणजे डॉक्टर आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल, २६ अलीपूर रोड, नवी दिल्ली हे होय.डॉ. आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल २६, अलीपूर रोड, दिल्ली येथे आज डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण स्थळी त्यांचे जीवन आणि योगदान यांना समर्पित आहे.

हे स्मारक सुमारे ७४०० चौरस मीटर क्षेत्रावर असून आणि रुपये १०० कोटी खर्चून बांधले गेले. या परिसरात वापरलेला दगड आयात केला गेला आहे. हे स्मारक पूर्णपणे ग्रीन बिल्डिंग आहे. खुल्या पुस्तकाच्या आकाराचे हे भारतातील पहिले सुंदर स्मारक आहे. स्मारकाच्या मुख्य इमारतीचा आकार हा भारताच्या संविधानाचे आणि सक्षमीकरणाचे प्रतीक आहे. मेमोरियल बिल्डिंग बाहेरील परिसर अत्यंत रमणीय आणि मनमोहक आहे. मेमोरियल मध्ये प्रवेश करीत असतानां आपल्याया ११ मीटर अशोक अशोक स्तंभ आणि सांची स्तूपाच्या दरवाज्यासारखे दोन तोरण दरवाज्याचे दर्शन होते.


भारताच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या निमंत्रणावरून, श्री सतेंद्र पखाले यांनी ही अत्यंत सुंदर वास्तुकला तयार केली. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर आपल्याला एका पूर्णपणे वेगळ्या जगात आल्यासारखे वाटते.या इमारतीत प्रवेश केल्यावर डॉ. आंबेडकर यांचा १२ फूट उंचीच्या कांस्य पुतळ्याचे दर्शन होते. पहिल्या मजल्यावर बाबासाहेबांच्या जीवनाशी संबंधित उच्च दर्जाचे प्रदर्शने आहेत. दुमजली इमारतीच्या खालच्या स्तरावर एक प्रदर्शन गॅलरी आहे, जिथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या आवारात घालवलेले दिवस चित्रित केले आहेत. त्याचे शेवटचे दिवस आणि अनेक प्रसंग ही ज्वलंतपणे टिपण्यात आलेले आहेत. काळाराम मंदिर सत्याग्रह, बडोद्याचे चिन्तन स्थळ, नागपूर येथील बुद्ध धम्म दीक्षेचा कार्यक्रम आणि डॉक्टर बाबासाहेबांची राजकीय, सामाजिक चळवळ आणि जीवन संघर्ष आधुनिक डिजिटल तंत्राचा वापर करून अत्यन्त प्रभावीपणे प्रदर्शित केले आहे. खालचा मजला अधिक स्वारस्यपूर्ण आहे, ज्यामध्ये संविधानाची पाने प्रदर्शनात आहेत. मूळतः नंदलाल बोस यांनी रेखाचित्रे केलेलीं संविधानाची पाने निवांतपणे पाहू शकतो. मेमोरियल मध्ये गौतम बुद्धांच्या संगमरवरी पुतळ्यासह एक विपश्यना ध्यान हॉल देखील आहे. स्मारकाचे एकूण वातावरण हे आधुनिक विज्ञान आणि पारंपारिक बौद्ध वास्तुकला यांचे परिपूर्ण मिश्रण आहे. हे ठिकाण केवळ विविध घटनेच्या इतिहासामुळेच नाही तर प्रकाश आणि ध्वनी प्रभाव आणि रोबोटिक्सच्या वापरामुळे देखील विलक्षण आहे. ठीक ठिकाणी मोबाइल डिव्हाइस वापरून स्कॅन करण्यासाठी आणि त्या स्टॉल किंवा गॅलरीबद्दल अधिक माहिती वाचण्यासाठी एक ट्ठ कोड आहे. डॉ. आंबेडकर स्मारकाची वास्तुशिल्प रचना भारतीय उपखंडातील बौद्ध वास्तुकलेच्या उत्तम नमुना आहे. मेमोरियल मध्ये प्रवेश आणि मार्गदर्शनासाठी गाईड ची सुविधा विनामूल्य आहे. सोमवार वगळता हे स्थळ पाहण्यासाठी खुले असते. तळघरात पार्किंग सुविधा उपलब्ध आहे. कॅफेटेरियाचे चवदार अन्न नाममात्र दरावर उपलब्ध आहे. हे स्मारक संग्रहालय २ एकर जागेत पसरलेले आहे आणि हे नवी दिल्लीतील प्रसिद्ध पर्यटन आकर्षणांपैकी एक आहे. डॉ.आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाची भेट केवळ तंत्रज्ञानातील आधुनिकतेचा शोधच नाही तर स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री, संविधानाचे मुख्य शिल्पकार म्हणून डॉ. आंबेडकरांच्या भूमिकेला श्रद्धांजली आहे. आपण दिल्लीला आल्यावर वेळात वेळ काढून २६, अलीपूर रोड येथे भेट देण्यास विसरू नये.

--------------------------

**डॉ. के.पी .वासनिक ,**
**नवी दिल्ली ,९८९१९०१३१६**

# लग्नाच्या दिवशी इतरांपेक्षा सुंदर दिसायचयं? मग आहारात काय बदल करावा लागेल? तज्ज्ञ काय सांगतात जाणून घ्या

मेकअपशिवाय केवळ आहारात बदल करून तुम्ही तुमच्या चेहऱ्यावर नैसर्गिक सुंदरता कशी आणू शकता याबाबतची माहिती जाणून घेऊया. तुळशीच्या लग्नानंतर म्हणजेच दिवाळी संपताच आपल्याकडे लग्नाचा हंगाम सुरू होतो, तर हिवाळ्यात २३ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०२३ या कालावधीत देशभरात जवळपास ३५ लाख लग्न होऊ शकतात, असा अंदाज 'द कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' (उ–खढ) ने वर्तवला आहे. शिवाय प्रत्येकाला आपल्या लग्नाच्या दिवशी इतरांपेक्षा सुंदर दिसावं आणि चेहऱ्यावर चमक असावी असं वाटतं. आजकाल मेकअप करून प्रत्येकजण सुंदर दिसण्याचा प्रयत्न करतो. परंतु, मेकअपशिवाय जर तुम्हाला तुमच्या चेहऱ्यावर नैसर्गिक सुंदरता हवी असेल तर ती कशी आणू शकता, याबाबतची माहिती पोषणतज्ज्ञ किरण कुकरेजा यांनी दिली आहे, ती जाणून घेऊया. पोषणतज्ज्ञ किरण कुकरेजा यांनी सांगितलेले पाच उपाय –डिटॉक्स वॉटर विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करते, शरीराला हायड्रेट ठेवते आणि एकूणच निरोगी आरोग्याला प्रोत्साहन देते.भाजलेल्या अंबाडीच्या बियांमध्ये ओमेगा–३ फॅटी सिड आणि फायबर मुबलक प्रमाणात असते, जे पचनाला चालना देतात आणि त्वचेला चमकदार बनवतात.डी–ब्लोटिंग चहा पचनास मदत करतो आणि फुगणे कमी करतो, शिवाय हा चहा वधूंना अधिक आराम देण्यासह आत्मविश्वासात वाढ करण्यास मदत करू शकतो.बीटरूटचा रस हा



अँटिऑक्सिडंट्ससह जीवनसत्त्वे आणि खनिजांचा एक चांगला स्त्रोत आहे, जो चमकदार त्वचा आणि संपूर्ण आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.ताकामध्ये चरबीचे प्रमाण कमी असते, यामध्ये आतड्याच्या आरोग्यासाठी प्रोबायोटिक्स असतात, तसेच ते हायड्रेटिंग पेय ठरू शकते.हेही वाचा– डायबिटीसचा स्त्री व पुरुषांच्या प्रजनन क्षमतेवर नेमका कसा परिणाम होतो? बाळंतपणानंतर काय धोका असतो, वाचा निरोगी आणि चमकदार त्वचेसाठी हायड्रेशन अत्यंत महत्वाचे आहे. तसेच त्वचेसाठी कोणत्याही स्वरूपात पाणी उपयुक्त ठरते, असं डॉ. वंदना पंजाबी, त्वचाशास्त्रज्ञ आणि ट्रायकोलॉजिस्ट (खार आणि नानावटी मॅक्स सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल) यांनी सांगितलं. बीटरूटचा रस, अँटिऑक्सिडंट्सने युक्त असतो, तो त्वचेला तेजस्वी बनवतो आणि ताक त्याच्या प्रोबायोटिक्ससह आतड्यांचे आरोग्य वाढवते, असं विधी चावला, फिसिको डाएट आणि एस्थेटिक क्लिनिक या म्हणाल्या.तर डॉक्टर वंदना पंजाबी सांगतात की, फळे आणि भाज्यांचा रस सेवन करण्यापेक्षा त्या चावून खाव्यात, कारण यामुळे फळांमध्ये असलेल्या भरपूर फायबर सामग्रीचा आपल्याला फायदा होतो. तसेच बीटरूट, सफरचंद आणि डाळिंब हे लोहाचे समृद्ध स्त्रोत असून ते आपल्या त्वचेला गुलाबी चमक देतात. अंबाडीच्या बिया ओमेगा ३ चा समृद्ध स्त्रोत असून त्वचेसाठी अँटीऑक्सिडंट आणि दाहक–विरोधी फायदे त्यामध्ये आहेत. दही आणि ताकामध्ये प्रीबायोटिक्स आणि प्रोबायोटिक्सचे भरपूर स्त्रोत आहेत. ते मुरुम, एक्जिमा आणि रोसेसिया इत्यादी त्वचेसंबंधित समस्या टाळण्यासह त्वचेच्या काळजी घेण्यास मदत करतात, असंही डॉक्टर पंजाबी यांनी सांगितलं.

# पण 'ही' एक बाजू सांभाळाच!


मागील आठ वर्षांच्या अभ्यासादरम्यान, सहभागींचे तीन वेळा सर्वेक्षण केले गेले, ज्यात असे दिसून आले की ज्यांची मैत्री घट्ट होती त्यांच्या मृत्यूची शक्यता २४ टक्के कमी होती. एपिडेमियोलॉजी अँड सायकियाट्रिक सायन्सेस या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की वृद्ध व्यक्तींमधील मैत्री ही शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर घटक ठरू शकते. मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीमधील मानसशास्त्राचे सहयोगी प्राध्यापक व अभ्यासाचे सह–लेखक विल्यम चोपिक, यांच्या माहितीनुसार, यापूर्वीच्या संशोधनात मैत्री आणि विशिष्ट आरोग्य फायदे यांच्यातील संबंध अधोरेखित केले गेले होते पण हा अभ्यास आजपर्यंतचा सर्वात महत्त्वाचा आणि सर्वसमावेशक आहे.चोपिक आणि सहकाऱ्यांनी सांगितले की घट्ट मैत्री असलेल्या व्यक्तींच्या आयुष्यात काही वर्षांची भर पडू शकते. आठ वर्षांच्या अभ्यासादरम्यान, सहभागींनी तीन वेळा सर्वेक्षण केले, ज्यात असे दिसून आले की ज्यांची मैत्री घट्ट होती त्यांच्या मृत्यूची शक्यता २४ टक्के कमी होती. ज्यांच्याकडे चांगले व जिव्हाळ्याचे मित्र असतात त्यांचे व्यायाम करण्याचे प्रमाण ९ टक्के जास्त असते. नैराश्याचा अनुभव येण्याचा धोका १७ टक्क्यांनी कमी तर पक्षाघाताचा झटका येण्याची शक्यता १९ टक्क्यांनी कमी होते. डॉ पवना एस, सल्लागार मानसोपचार तज्ज्ञ आणि नातेसंबंध तज्ज्ञ, विद्यारण्यपुरा, बंगळुरू यांनी नमूद केले की, अर्थपूर्ण नातेसंबंधांमुळे तणावाचा थेट परिणाम मन व मेंदूवर होत नाही. तसेच रक्तदाब कमी होणे आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढणे यातही मदत होते. जवळच्या मित्रांकडून मिळणारे समर्थन मानसिक आरोग्य समस्यांचा धोका कमी करू शकते, ज्यामुळे शारीरिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो.अर्थपूर्ण मैत्रीद्वारे, तुम्ही सहानुभूती, संयम आणि प्रभावी संवाद शिकता. मित्र आव्हानांच्या वेळी साथ देतात, व स्वतःची स्वतःला ओळख करून देण्यासाठी उपयोगी ठरतात. वैविध्यपूर्ण मित्रांचा गट असल्यास तुम्हाला भिन्न दृष्टिकोन समजून घेण्यास व आपल्या विचाराच्या काखा रुंदावण्यास मदत होऊ शकते. विश्वास, सहकार्य यावर आधारित मैत्री आत्मशोध घेण्यासाठी व तुम्हाला अधिक दयाळू, मुक्त मनाची व्यक्ती बनवण्यासाठी फायद्याची ठरते.या मैत्रिला पण एक नकारात्मक बाजू आहे.डॉ. पवना यांनी यावर भर दिला की प्रौढावस्थेतही समवयस्कांचा दबाव व्यक्तींवर लक्षणीय प्रभाव टाकू शकतो. मित्रांच्या स्वभाव वैशिष्ट्यानुसार, निर्णय घेण्यावर आणि वागणुकीवर परिणाम होऊ शकतो. समवयस्कांकडून नाकारले जाण्याची भीती प्रौढांना वैयक्तिक मूल्यांऐवजी समूहाच्या मताशी जुळवून घेण्यास भाग पडू शकते.वाईट मित्र तुमचा स्वाभिमान कमी करू शकतात, स्पर्धात्मक वातावरण वाढवू शकतात किंवा आव्हानात्मक काळात असह्य होऊ शकतात, डॉ पवना यांनी स्पष्ट केले की मत्सर, गप्पाटप्पा आणि विश्वासाचा अभाव यामुळे नातेसंबंधाचा पाया खराब होऊ शकतो.

# पिक्चर मॉर्फिंगचा वाढता धोका

मॉर्फिंग तंत्रज्ञान सोपे आहे, वापरायला आज सुलभ आहे याचा अर्थ असा नाही की ते वापरुन एखाद्याला त्रास देणं योग्य आहे. तो दहावीत होता. प्रिलिम्स झाल्या आणि सगळ्यांनाच परीक्षांचे आणि कॉलेजचे वेध लागले. सेंड ऑफ पार्टी झाली. शाळा सोडताना काहीतरी वेगळं करायचं असा विचार करुन या मुलाने मुख्याध्यापकांच्यासह काही शिक्षकांचे फोटो मॉर्फ केले आणि शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या इन्स्टा पेजवर टाकले. शिवाय व्हॉट्सअप ग्रुप्समध्येही शेअर केले. बघता बघता फोटो व्हायरल झाले आणि पसरत पसरत शिक्षकांच्या पर्यंत जाऊन पोहोचले.फोटो मॉर्फिंग करताना विद्यार्थ्याने वाह्यातपणा केलेला नव्हता. पण तरीही कार्टून सारखे फोटो केले होते. काही शिक्षकांना आणि मुख्याध्यापकांना मात्र ते आवडले नाही. आपला अपमान झाला आहे असं वाटून कुणी हे फोटो बनवले याची शोधाशोध केली गेली आणि विद्यार्थी सापडला. शाळेने पोलिसात तक्रार दाखल केली. दहावीच्या मुलाची पोलिसात तक्रार दाखल झाल्यावर पालकांचं धाबं दणाणलं. पालकांची विनंती आणि मुलाचे समुपदेशन यानंतर शाळेने तक्रार मागे घेतली. या संपूर्ण प्रकरणात आपण काहीतरी चुकीचे करतो आहोत हे त्या मुलाच्या लक्षातच आलं नसल्याचं समुपदेशकांना जाणवून गेलं. आपण जसे आपल्या समवयस्कांची मजा करतो तसंच आपण शिक्षकांबरोबर केलं आणि त्यात काय एवढं रागावण्यासारखं असंच त्या विद्यार्थ्याला बराच काळ वाटत होतं. दुसऱ्या एका घटनेत एका टीनएजर मुलीने वर्गात मैत्रिणीचं बाईंनी अधिक कौतुक केल्यामुळे मत्सरापोटी मैत्रिणीचा फोटो मॉर्फ केला. कुठलंसं मॉर्फिंग एप वापरताना तिने एका नग्न देहावर मैत्रिणीचा चेहरा लावून तो फोटो व्हायरल केला. याही प्रकरणात गोष्टी पोलिसांपर्यंत गेल्या होत्या मात्र समुपदेशन, पोलिसांची मध्यस्ती यानंतर गोष्टी निवळल्या आणि तक्रार मागे घेतली गेली.तिसऱ्या घटनेत एक मुलगा बरेच दिवस एका मुलीला ऑनलाईन स्टॉक करत होता. तिच्या प्रत्येक फोटोवर त्याची पहिली कॉमेंट असायची, सगळ्या पोस्ट लाईक करायचा, ती जिथे जाईल तिथे जाण्याचा प्रयत्न करायचा. एक दिवस तो तिला जाऊन भेटला आणि त्याने तिला प्रपोज केलं. तिला अर्थातच त्याच्याविषयी काहीच माहिती नसल्याने तिने नकार दिला. त्याला तो नकार पचवता आला नाही आणि त्याने तिचे सोशल मीडियावरचे फोटो जे आधीच डाउनलोड केलेले होते ते मॉर्फ करुन, नग्न देहावर तिचा चेहरा चिकटवून व्हायरल केले.फोटो मॉर्फ करणं आज अतिशय सोपी गोष्ट आहे. एआयनंतर तर अधिकच सोपा प्रकार झालेला आहे. अनेक ऍप्स उपलब्ध असतात. कुणीही हे काम आज करू शकते. अशावेळी अशा पद्धतीने फोटो मॉर्फ करणं चुकीचं आहे, कायदेशीर कारवाई होऊ शकते या गोष्टी मुलांना माहिती असणं आवश्यक आहे. गंमत म्हणून, राग आला म्हणून, बदला घेण्याच्या भावनेतून टीन्स आणि तरुणांच्या हातून या गोष्टी घडतात. यासाठी मुळात आपल्या भावना हाताळायचा कशा हेही मुलांना शिकवणं आवश्यक आहे. आपल्याला राग आला, मत्सर वाटला म्हणून दुसऱ्याला त्रास देणं म्हणजे गुन्हेगारी वृत्तीकडे जाणं असतं. मॉर्फिंग तंत्रज्ञान सोपे आहे, वापरायला आज सुलभ आहे याचा अर्थ असा नाही की ते वापरुन एखाद्याला त्रास देणं योग्य आहे. यातला फरक मुलांना समजावून सांगणे आवश्यक आहे.प्रत्येक सायबर गुन्ह्याचा तपशीलाने जेव्हा आपण विचार करतो तेव्हा तो माध्यम साक्षरतेपर्यंत येऊन पोहोचतो हे लक्षात घेऊया. कायदेशीर कारवाई, नियम या सगळ्या गोष्टींनी अशा प्रकरणावर आळा बसू शकतोच पण माध्यम साक्षर होणं आणि माध्यमं योग्य पद्धतीने वापरायला शिकणं ही अधिक महत्वाची गोष्टी आहे. तो शाश्वत मार्ग आहे.



# पालक बेफाम, मुलांना मात्र शिस्त?



मुलांना एकदा सवय झाली आणि मुलं किशोरवयात आली की पालक अचानक जागे होतात आणि मुलांच्या हातातला फोन काढून घ्यायला बघतात. एव्हाना, फोन सतत जवळ असण्याची सवय मुलांना लागलेली असते. लहान मुलांच्या हातात मोबाईल देताना अनेकदा या मोबाईलच्या सवयीचं पुढे काय होईल याचा विचार पालकांनी केलेला नसतो. सुरुवातीला ही पालकांची सोय असते. पण मुलांना एकदा सवय झाली आणि मुलं किशोरवयात आली की पालक अचानक जागे होतात आणि मुलांच्या हातातला फोन काढून घ्यायला बघतात. एव्हाना, फोन सतत जवळ असण्याची सवय मुलांना लागलेली असते. दहाबारा वर्षांची किंवा त्याहीपेक्षा लहान मुलं मोबाईल घेऊन काय करतात? तर गेम्स खेळतात आणि त्यावरच्या वयोगटातली मुलं गेम्सबरोबर व्हॉट्सप, इन्स्टाग्राम, फेसबुक यावर वावरायला लागतात. मुलांच्या मोबाईल गेम्सची स्वतंत्र इंडस्ट्री आपल्याकडे उभी राहिली आहे. ते त्यांना माहीत असलेल्या साइट्स बघतात, गुगल करून नवीन साइट्स शोधतात. यूट्युबवर वेगवगळे व्हिडिओज बघतात. पॉर्न साईट्सवर जातात. नेटवरचा मुलांचा संचार आपल्याला वाटतो त्यापेक्षा कित्येक पटींनी जास्त आणि वेगवान आहे. भारतीय माणसांचा सर्वसाधारण स्क्रीन टाइम सात ते आठ तासांचा आहे. आणि यात मुलंही आलीच.जिथे पालकांनाच इंटरनेट वापरासंदर्भात बंधनं नको असतात; तिथे ती लहान मुलांना का हवीशी वाटतील? बहुतेकदा स्मार्टफोनच्या सवयी किंवा व्यसनं पालकांमुळेच मुलांना लागतात. एकतर अनेकदा पालक स्वतःच नको त्या वयात मुलांच्या हातात फोन देतात किंवा पालकांचाच स्क्रीन टाइम इतका प्रचंड असतो की त्यांचं बघून मुलंही प्रचंड प्रमाणात फोन वापरायला लागतात. बाथरूममध्ये फोन घेऊन जाणाऱ्या मुलांचे पालकही अनेकदा बाथरूममध्ये फोन घेऊन जाणारे असतात. आईबाबा स्मार्टफोन कसा वापरतात हे बघून मुलं स्वतःच्या हातातला फोन वापरायला शिकतात. ज्याप्रमाणे आजूबाजूच्या बऱ्याच गोष्टी मुलं अनुकरणातून आणि अनुभवांतून शिकतात; त्याच पद्धतीनं स्मार्टफोन, इंटरनेट हे वापरणंही मुलं पालकांकडून कळत–नकळत शिकतात हे समजून घेतलं पाहिजे. पालकांच्या इंटरनेटच्या आणि स्मार्टफोन वापराच्या सवयी ज्या आणि जशा आहेत; त्यांचा प्रभाव मुलांवर पडणार आहे. इंटरनेट, सोशल मिडिया आणि स्मार्टफोन या आधुनिक काळाच्या महत्त्वाच्या क्रांतीचा प्रभाव आपल्या मुलांच्या जगण्यावर असणार आहे हे समजून घेऊन स्वतःच्या डिजिटल सवयी जर पालकांनी योग्य केल्या तर मुलांपर्यंत ते पोहोचणार हे लक्षात घ्या. आजची मुलं या तंत्रज्ञानाच्या डाएटबरोबरच मोठी होत आहेत ही गोष्ट मान्य करायला हवी. अनेकदा पालकांना मानसिक पातळीवर या गोष्टीचा स्वीकार नसतो; त्यामुळे मुलांच्या आयुष्यातलं आभासी जग त्यांना आवडत नाही, झेपत नाही. आपल्यापेक्षा वेगळं जगणाऱ्या मुलांशी जीवनशैलीवरून त्यांची भांडणं होतात. तंत्रज्ञानाशी किंवा तंत्रज्ञानाविषयी मुलांशी भांडून प्रश्न सुटणार नाही.आपण एकदा पालक झालो की जगातले सगळे नियम फक्त आपल्या मुलांसाठी आहेत आणि ते नियम राबवून आपण मुलांना योग्य वळण आणि शिस्त लावतो असा आपला म्हणजे तमाम पालकांचा समज असतो पण वर म्हटल्याप्रमाणे मुलं अनुकरण करतात. जर मुलांनी स्मार्टफोन योग्य पद्धतीनं वापरावा असं वाटत असेल, जर त्यांच्या तंत्रज्ञान वापरासंदर्भातल्या सवयी चांगल्या विकसित व्हाव्यात असं वाटत असेल; तर नियम फक्त मुलांसाठी करून चालणार नाही. आधी नियम पालकांनी स्वतःला लावले पाहिजेत. मुलांना शिस्त लावण्याआधी स्वतःला शिस्त लावली पाहिजे. जर तुमचा सोशल मिडिया आणि स्मार्टफोन वापर मुलांना चांगला आणि 'हेल्दी' दिसला; तर त्यांच्या सवयीही तशाच तयार होतील हे लक्षात घ्या. आपल्याकडे होतं उलट.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने कोटी कोटी प्रणाम.!

नुकतीच देशाचे शिल्पकार : आंबेडकर द्वेष ( छरींळेप ईींळश्रवशी : हरींश रालशवङ्गरी) ही अनुसया आर्ट्सची संतोष कांबळे दिग्दर्शित शॉर्ट फिल्म बघण्याचा योग आला. त्यात कॉर्पोरेट कार्यालयातील कर्मचारी चर्चा करताना, सहा डिसेंबरला होणार्या गर्दीमुळे शिवाजी पार्कमध्ये अतिशय घाण होऊन, आठवडाभर तिकडे जाण्याची ईच्छा होत नाही.एव्हढी गर्दी का होते? त्यांना रेल्वे फुकट असते. अशी कुचेष्टेने चर्चा करीत असताना, त्यातील महिला कर्मचारी विचारते की, कोण हे डॉ. आंबेडकर ? त्यांनी देशासाठी काय केलय? त्यावर आंबेडकरी अनुयायी त्यांना सांगतो की, आपल्या उद्धारकर्त्याला ६ डिसेंबरला अनुयायी श्रद्धेने अभिवादन करायला चैत्यभूमीवर येतात . ते काही फुकटात येत नाहीत. याउलट त्या दिवशी रेल्वेचे उत्पन्न वाढते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे शिल्पकार असून, दामोदर व हिराकुड प्रकल्प त्यांच्या संकल्पनेतून साकार झाले आहेत. त्यांच्या प्रॉब्लेम ऑफ रुपीज ह्या ग्रंथानुसार रिजर्व बँकेची उभारणी केली आहे. त्यांनी समता, स्वातंत्र्य व बंधुभाव आधारित, उत्कृष्ट संविधान देशाला दिले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांना चूल आणि मूल ह्यातून बाहेर काढून शिक्षण व मतदानाचा अधिकार दिला. तसेच स्त्रियांसाठी हिंदू कोड बिल संसदेत सादर केले. ते मजूर मंत्री असताना, स्त्री कर्मचार्यांना बाळंतपणाची रजा, कामगारांना आठ तासाची ड्युटी, कामाच्या अधिकच्या तासांचा मोबदला, त्यांच्या हक्कांच्या सुरक्षेसाठी युनियनला मान्यता, भविष्य निर्वाह निधी, आदी कायदे केले. हे ऐकल्यानंतर सॉरी म्हणत चर्चा संपते.

इथे मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो की, बाबांच्या महापरीनिर्वाण दिनी इतक्या प्रचंड संख्येने अनुयायी चैत्यभूमीवर अभिवादन करण्यास येतात की, राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेने कितीही सुविधा उपलब्ध करून दिल्या तरी त्या कमीच पडतात. त्यामुळे घाण होणे सहाजिकच आहे. परंतु ७ डिसेंबर रोजी मुंबईतील अनेक आंबेडकरी संघटनांचे तरूण कार्यकर्ते महानगरपालिकेच्या कर्मचार्यांच्या बरोबर तो सर्व परिसर स्वच्छ करतांना दिसून येतात. असे कितीतरी कार्यकर्ते माझ्या परिचयाचे आहेत. जे लोक कुत्सितपणे टीका करतात त्यांना हे दिसत नाही की काय ?.

वास्तविक पाहता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर आणि राष्ट्रहिताच्या दृष्टीने जगातील सर्वोत्कृष्ट समता ,स्वातंत्र्य, बंधुभाव, धर्म निरपेक्ष लोकशाही आधारित संविधान या देशाला दिले. ते सरकारमध्ये मंत्री असतांना कितीतरी योजना कष्टपूर्वक कार्यान्वित केल्या आहेत. तत्कारण देशातील सर्व थरातून त्यांना अभिवादन अपेक्षित आहे. परंतु तसे होतांना दिसत नाही, याउलट त्यांची व त्यांच्या अनुयायांची टिंगल करण्यात धन्यता मानणाऱ्यांची संख्या खूप आहे. अशा लोकांची कीव करावीशी वाटते.

बाबासाहेबांविषयी जाणूनबुजून पसरविण्यात आलेल्या चुकीच्या माहितीमुळे व आकसापोटी त्यांच्यावर टीका करणारे खूप लोक आहेत. त्यांनी फक्त दलितांसाठीच काम केल्याचा गैरसमज पसरविण्यात सनातनी लोकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. बाबासाहेब खरेच असे संकुचित होते काय? मग त्यांनी राष्ट्रासाठी केलेले योगदान खोटे आहे काय? त्यांनी हिंदु कोड बिल का व कुणासाठी लोकसभेत मांडले ? तसेच ते स्थगित केल्याचे समजताच क्षणाचा ही विलंब न लावता त्यांनी मंत्री पदाचा राजीनामा का दिला? त्यात फक्त दलित स्त्रियांच्या हक्कांबाबत विचार केला होता का? याबाबत संक्षिप्त चर्चा करू या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ठाम मत होते की,कोणत्याही समाजाचे मूल्यमापन, त्या समाजातील महिलांच्या स्थितीवर अवलंबुन असते. कोणत्याही देशाच्या प्रगतीसाठी महिलांचा विकास अत्यंत आवश्यक आहे. जर विकासाचे शिखर गाठायचे असेल, तर महिलांना सुशिक्षित व सशक्त केले पाहिजे.

भारतातील सर्व स्त्रियांना जाचक रुढी आणि परंपरांपासून सुटका मिळावी व त्यांची सार्वत्रिक उन्नती होऊन, त्यांना समानतेची वागणूक मिळावी. यासाठी त्यांनी तीन वर्षे अभ्यास करून ह्या विधेयकाचा मसुदा तयार केला. तो १९४८ साली संविधान सभेत सादर केला. त्यांचे असे मत होते की, जाती व्यवस्थेमध्ये स्त्रियांना कमी लेखले जात असल्यामुळे, हे विधेयक मंजूर झाले तर, त्यांना अधिकार प्राप्त होतील. त्याचा देशाच्या विकासासाठी फायदा होईल. स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, विधवा व मुलींना संपत्तीत समान वाटा, विधवांचा पुनर्विवाह, हे सर्व अधिकार हिंदू कोड बिलाची देण आहे. त्यांनी २४/०२/१९४९ रोजी हे बिल संसदेत मांडले. त्यावर संसदेत अनेकदा चर्चा झाली. हे बिल हिंदू धर्मातील अनेक कुप्रथाना दूर करणारे होते. जे लोक परंपरेच्या नावाखाली कट्टरतावादि सनातनी प्रथा जिवंत ठेऊ इच्छित होते ,त्यांनी ह्या बिलास जोरदार विरोध केला. ह्यात प्रामुख्याने राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद, गृहमंत्री सरदार वल्लभ भाई पटेल, उद्योगमंत्री श्यामाप्रसाद मुखर्जी, हिंदु महासभेचे पंडित मदन मोहन मालविय व पट्टाभी सीतारामय्या इतर दिग्गज नेते होते. त्यांच्या समोर पंडित नेहरू हतबल झाले. दुर्दैव म्हणजे काही सनातनी स्त्रिया देखील ह्या बिलाच्या विरोधात गेल्या.

पंडित नेहरूंनी दिल्लीहून बाबासाहेबांना तार पाठवली. त्यात ते म्हणतात की, हिंदू कोड बिलाला देशात सर्वत्र विरोध असून, ते संसदेत मंजूर होणार नाही.त्यातील मागण्यांना प्रचंड विरोध आहे. त्यामुळे नवीन वाद निर्माण होईल. यास्तव सदर विधेयक स्थगित करीत आहोत. तुमची स्त्रियांविषयी तळमळ आम्ही समजतो, तुम्ही देखील आम्हाला समजून घ्या.

तेव्हा बाबासाहेबांनी रागावून त्यांना प्रत्युत्तर दिले की, स्त्रियांना मूलभूत अधिकार मिळावेत म्हणुन मी हे बिल संसदेत मांडले. ते मंजूर न होता, तहकूब करण्यात आले. ह्याचे मला अतिशय दुःख झाले. खरे तर या देशातील समाज सुधारणांच्या हेतूने मी मंत्रीमंडळात सहभागी झालो. त्यात स्त्रियांना मूलभूत अधिकार मिळावेत हा मुद्दा महत्वाचा आहे. जर माझा हेतू सफल होत नसेल, तर माझ्या मंत्री पदाचा काय उपयोग ? त्यांनी हिंदू कोड बिलाचा खून झाला. असे म्हणत २५/ ११/१९५१ रोजी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. हिंदू कोड बिल स्थगित केले म्हणुन,आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा देणारे पहिले व्यक्ति अशी इतिहासात नोंद झाली आहे. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुका नंतर हे बिल टप्प्या टप्प्याने मंजूर झाले. त्याचे चार तुकडे केले. १) हिंदू विवाह कायदा, २) हिंदू वारसाहक्क कायदा, ३) हिंदू अंडरएज पालकत्व कायदा, ४) हिंदू दत्तक व पोटगी कायदा. ह्याचा अर्थ एकच होतो की, आपल्या देशातील पुरुष प्रधान संस्कृतीतील सनातनी लोकांना धर्मशास्त्र आधारित समाज व्यवस्थेला धक्का बसू द्यायचा नव्हता. भारतातील स्त्रीला चूल आणि मूल ह्यातून मुक्त करून विकासाच्या दिशेने भरारी घेण्यास, त्यांचे सनातनी विचार आडकाठी करीत होते. त्यावर कळस म्हणजे एक शूद्र दलित ह्या सुधारणा करू पाहतो. ही गोष्ट त्यांच्या पचनी पडली नाही. हे मात्र निर्विवाद सत्य आहे. ७

आजच्या धावपळीत तसेच दिवसभर मनोरंजन उपलब्ध असल्यामुळे वाचन संस्कृती जवळजवळ लोप पावली आहे.जगाने बाबासाहेबांच्या कार्याची दखल घेतल्याचे दिसून येते परंतु दुर्दैव असे की, जातीयतेच्या द्वेषातून बाबासाहेबांचे चुकीचे चित्र भारतीय जनमानसाच्या मनावर बिंबवण्यास सनातनी यशस्वी झाल्याचे दिसून येते. म्हणुन बाबासाहेबांची खरी माहिती सगळ्यांना समजणे अतिशय गरजेचे असल्यामुळे इतिहासाची पाने पुन्हा पुन्हा चाळून, छोट्या छोट्या लेखांतून, सर्वांना त्यांच्या ऐतिहासिक कार्याची माहिती करून देणे, ही काळाची गरज आहे. जेणेकरून बाबासाहेबांच्या बाबती असलेले गैरसमज दूर होण्यास मदत होईल .जर आपण असे करू शकलो तर, ती बाबांना खरी आदरांजली ठरेल

**अरुण निकम.**
९३२३२४९४८७.
मुंबई..

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे अभिवादन

मुंबई :- भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पचक्र अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. दादर येथील चैत्यभूमी येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार राहुल शेवाळे, आमदार आशिष शेलार,प्रवीण दरेकर,सदा सरवणकर कालिदास कोळंबकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव आंबेडकर, माजी खासदार नरेंद्र जाधव, मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल,भिक्खू महासंघाचे अध्यक्ष डॉ. भदन्त राहुल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे,सरचिटणीस नागसेन कांबळे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिका जनसंपर्क विभागामार्फत आयोजित छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी भेट दिली.बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुंबई महापालिकेतर्फे प्रकाशित डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जागतिक पाऊलखुणा' ही माहिती पुस्तिका मान्यवरांना भेट देण्यात आली.



# परळीत शक्तिप्रदर्शन

परळी : प्रतिनिधी परळीत राज्य शासनाचा शासन आपल्या दारी कार्यक्रम आज पार पडला. तीन राज्यांत भाजपला मिळालेले यश आणि राज्यात भाजप-शिवसेना-राष्ट्रवादीचे ट्रिपल इंजिन सरकार यामुळे सत्ताधारी महायुतीचा आत्मविश्वास दुणावला असून, याचीच प्रचिती आजच्या कार्यक्रमात आली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आतापर्यंत राज्यात झालेल्या २० शासन आपल्या दारी कार्यक्रमात परळीत रेकॉर्डब्रेक गर्दी पाहायला मिळाली.त्यामुळे हा कार्यक्रम सर्वांत यशस्वी ठरल्याचा दावा केला. यावेळी सर्वच नेत्यांनी सरकारच्या कामकाजाचा आढावा घेत विरोधकांवर हल्लाबोल केला. मात्र, यात सर्वांत मोठे आकर्षण माजी मंत्री पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे एकाच व्यासपीठावर येण्याचे होते. त्यामुळे सभेला गर्दी जमली होती.यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, माजी मंत्री पंकजा मुंडे आदी उपस्थित होते.तत्पूर्वी मुख्यमंत्र्यांसह सर्वच नेत्यांनी गोपीनाथ गडावर जाऊन गोपीनाथ मुंडे यांच्या समाधाचे दर्शन घेतले. त्यावेळी तेथे धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्यात गळाभेट झाली. त्यानंतर सर्वांनी मिळून वैद्यनाथाचेही दर्शन घेतले. त्यानंतर या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी तब्बल १ कोटी ८४ लाख लोकांनी शासन आपल्या दारी योजनेचा लाभ घेतल्याचा दावा केला. याप्रसंगी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना सर्वांनी लक्ष्य केले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जे अडीच वर्ष घरात बसले त्यांना शासन आपल्या दारी कार्यक्रम काय समजणार, असा सवाल करीत आता त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे, असे म्हटले, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधताना तुम्हाला शेजारच्या घरात कुणी विचारत नाही, आम्हाला शेजारच्या राज्यात प्रचारासाठी बोलवतात, असा टोला लगावला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित



पवार, कृषिमंत्री धनंजय मुंडे, माजी मंत्री पंकजा मुंडे यांचीही भाषणे झाली.शेतक-यांना १२ तास दिवसा वीज मिळणार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढच्या वर्षात सर्व शेतक-यांना दिवसा १२ तास वीज दिली जाणार आहे, असे सांगत शेतक-यांना मागच्या अनेक वर्षांपासून दिवसा अर्धी, रात्री अर्धी वीज मिळत आहे. त्यामुळे शेतक-यांना अनंत अडचणीचा सामना करावा लागत आहे. मात्र, पुढील वर्षापासून ३६५ दिवस दिवसा वीज दिली जाईल, असे म्हटले.विकासासाठी कोणत्याही मंचावर जाण्याची तयारी परळीच्या विकासासाठी माझी कोणत्याही मंचावर जाण्याची तयारी असल्याचे वक्तव्य भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी केले. माझ्या राजकीय जीवनामध्ये मी कधीही जात, धर्म, पक्ष बघितला नाही. कोणताही द्वेष मनात ठेवला नाही. कारण तुमचे कर्ज आमच्या डोक्यावर आहे. ते ऋण फेडण्याचे काम आम्ही करत असल्याचे

पंकजा मुंडे म्हणाल्या.नाराजी कायम?

माजी मंत्री पंकजा मुंडे यांनी शासन आपल्या दारी कार्यक्रमाला हजेरी लावली. परंतु आज त्यांनी आपल्या आवेशात भाषण केले नाही, तर सावध पवित्रा घेत खासदार प्रीतम मुंडे संसदेच्या अधिवेशनासाठी दिल्लीत असल्याने आपण त्यांचे प्रतिनिधी म्हणून आणि परळीची कन्या म्हणून मी उपस्थित असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांची नाराजी कायम आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# दरोडेखोरांचा पोलिसांना गुंगारा

भोजपूर : जिल्ह्यामध्ये ॲक्सिस बँकेच्या शाखेत दरोडा पडला होता. बुधवारी सकाळी ११ च्या सुमारास सात ते आठ सशस्त्र दरोडेखोर घुसले होते. पोलिसांना याची माहिती देण्यात आली. पोलिसांनी बँकेला समोरून घेरले देखील. गोळीबार होणार हे गृहीत धरून पोलिसांचे रायफल, पिस्तुल अशा अद्ययावत शस्त्रे असलेले पथक देखील आले. बुलेट प्रूफ जॅकेटही मागविण्यात आले होते. परंतू, दरोडेखोरांनी पोलिसांच्याच हातावर तुरी देत निसटले.या घटनेमुळे बाहेरून आतमध्ये डोकावणा-या पोलिस यंत्रणेचे हसे झाले. दरोडेखोरांनी कॅश काऊंटरवरून १६ लाख रुपये बॅगेत भरले आणि बँकेच्या मागच्या दरवाजाने पळून गेले. जवळपास १०.५० मिनिटांनी ग्राहक म्हणून ते बँकेत आले होते. पिस्तुलीचा धाक दाखवून या लोकांनी ग्राहक तसेच बँक कर्मचा-यांना धमकावले होते. बँकेचे मॅनेजर असहर काझी यांच्यासह १४ जणांचा स्टाफ बँकेत काम करत होता. दरोडेखोरांनी चार मिनिटांतच हातात येईल ते घेतले आणि तिथून पोबारा केला. जाताना मॅनेजरसह अन्य कर्मचा-यांना मारहाणही केली. दरोडेखोरांचे वय जवळपास २१ वर्षे होते. बँक कर्मचा-यांना एका खोलीत बंद केले होते, असे पोलिसांनी सांगितले.बँक कर्मचा-यांनी पोलिसांना फोन करून याची माहिती दिली. पोलिसांनी तातडीने बँकेला घेरले होते. आत डोकावून पाहिले तर दरोडेखोर दिसत नव्हते.

# चीन, अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्यांमध्ये फोनवर चर्चा

नवी दिल्ली : चीन आणि अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्यांमध्ये बुधवारी फोनवर चर्चा झाली. इस्रायल-हमास युद्धाच्या पार्श्वभूमीवर चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी आणि अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटोनी ब्लिंकन यांनी ही चर्चा केली आणि युद्ध थांबवण्याच्या आवश्यकतेवर दोघांनीही सहमती दर्शविली. यूएस स्टेट डिपार्टमेंटच्या म्हणण्यानुसार, दोन्ही नेत्यांमधील संभाषणात, ब्लिंकन यांनी संघर्षाची व्याप्ती रोखण्यासाठी सर्व पक्षांनी काम करण्याची' गरज पुन्हा सांगितली. वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी इस्रायल आणि हमास यांच्यात सुरू असलेल्या संघर्षात गोळीबार थांबवणे आणि शक्य तितक्या लवकर युद्ध संपवणे हे पहिले प्राधान्य असल्याचे सांगितले. वांग यी म्हणाले की, चीन हे संघर्ष थांबवण्यासाठी सर्व पक्षांसोबत काम करण्यास तयार आहे.दोन राज्यांच्या तोडग्यावरही त्यांनी भर दिला.रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन बुधवारी सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीच्या (युएई) अधिकृत दौऱ्यावर आहेत. हा दौराही महत्त्वाचा मानला जात आहे कारण



युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर व्लादिमीर पुतिन यांनी मोजक्याच देशांना भेट दिली आहे. पुतीन यांचा दौरा अशा वेळी होत आहे, जेव्हा रशियाने मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षात मध्यस्थाची भूमिका बजावण्याचा आपला इरादा दर्शवला आहे. पुतिन आपल्या भेटीदरम्यान व्यवसाय आणि गुंतवणूक तसेच इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धावर चर्चा करतील. पुतीन यांनी ७ ऑक्टोबर रोजी इस्रायलवर हमासच्या हल्ल्यानंतर सुरू असलेले युद्ध हे अमेरिकन मुत्सद्देगिरीचे अपयश असल्याचेही म्हटले आहे.

# जम्मू-काश्मीरशी संबंधित दोन विधेयके लोकसभेत मंजूर

नवी दिल्ली : संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा बुधवारी तिसरा दिवस आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी लोकसभेत जम्मू-काश्मीर आरक्षण दुरुस्ती विधेयक सादर होते. दरम्यान, केंद्रीय विद्यापीठे (सुधारणा) विधेयक, २०२३ लोकसभेत सादर करण्यात आले आहे. विधेयकावर चर्चा करून ते मंजूर केले जाईल. यासोबतच जम्मू-काश्मीरशी संबंधित दोन विधेयकेही लोकसभेत मंजूर करण्यात आली आहेत. जम्मू आणि काश्मीर आरक्षण दुरुस्ती कायदा २०२३ आणि जम्मू काश्मीर पुनर्रचना सुधारणा विधेयक २०२३ हे दोन विधेयक मंजूर करण्यात आले आहेत.जम्मू आणि काश्मीर आरक्षण कायदा, २००४ मध्ये सुधारणा करणे या एका विधेयकाचा उद्देश आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय समुदायांसाठी व्यावसायिक संस्थांमध्ये नियुक्ती आणि प्रवेशामध्ये आरक्षण प्रदान करण्यासाठी विधेयक आणण्यात आले आहे. या विधेयकात आरक्षण कायद्याच्या कलम २ मध्ये दुर्बल आणि वंचित वर्गाचे (सामाजिक जाती) नाव बदलून इतर मागासवर्ग असे बदल करण्याची तरतूद आहे. विधेयकात काश्मिरी स्थलांतरित, पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील विस्थापित लोक आणि अनुसूचित जमातींना त्यांच्या राजकीय हक्कांसाठी तसेच त्यांच्या सर्वांगीण सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी जम्मू आणि केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभेत प्रतिनिधित्व देण्याची तरतूद आहे.तसेच चालू आर्थिक वर्षात एकूण ५८,३७८ कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चासाठी सरकारने बुधवारी लोकसभेची मंजुरी मागितली आहे. वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी २०२३-२४ या वर्षासाठीच्या अनुदानाच्या पुरवणी मागण्यांची पहिली तुकडी खालच्या सभागृहात मांडली. अनुदानाच्या पुरवणी मागण्यांमध्ये १.२९ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्तीचा एकूण अतिरिक्त खर्च देखील समाविष्ट आहे, जो ७०,९६८ कोटी रुपयांच्या बचतीद्वारे भरला जाईल.



# भाजपने निवडणुकीपूर्वी खोटी आश्वासने दिली : ममता बॅनर्जी

कोलकाता : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बुधवारी भारतीय जनता पक्षावर निशाणा साधला. निवडणुकीपूर्वी भाजपने मतदारांची फसवणूक केल्याचा दावा ममता बॅनर्जी यांनी केला आहे. भाजपने निवडणुकीपूर्वी खोटी आश्वासने दिल्याचा आरोप त्यांनी केला. कोलकाता येथील नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावर पत्रकारांशी बोलताना त्या म्हणाल्या की, केंद्रीय एजन्सी 'भाजपला खुराक देण्यासाठी' वारंवार पश्चिम बंगालचा दौरा करत आहेत.ममता बॅनर्जी यांनी भाजपला देशातील सर्वात मोठे खिसेकापू असे संबोधले आहे. त्या म्हणाल्या की, त्यामुळे लोकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. त्यांनी प्रत्येक व्यक्तीच्या



खात्यात १५ लाख रुपये ट्रान्सफर करण्याचे आश्वासन दिले होते, त्यानंतर त्यांनी नोटाबंदी लागू केली आणि नंतर महामारीमुळे निवडणुकीच्या काळात मोफत रेशन देणे अचानक बंद केले. निवडणुकीपूर्वी खोटी आश्वासने देऊन लोकांना फसवतात, असा आरोप त्यांनी भाजपवर केला आहे. आम्ही (तृणमूल काँग्रेस) त्यांच्यासारखे नाही, असे ममता बॅनर्जी यांनी ठणकावून सांगितले. उत्तर प्रदेशचे उदाहरण देताना ममता बॅनर्जी म्हणाल्या की, मोठ्या प्रमाणात बनावट जॉब कार्ड आढळून आल्यानंतरही उत्तर प्रदेशाला निधी दिला जात आहे. मात्र केंद्र सरकार १०० दिवस काम योजनेचे पैसे पश्चिम बंगालला देत नाही. पश्चिम बंगालच्या थकबाकीसाठी ममता बॅनर्जी यांनी नरेंद्र मोदींना भेटावे या गिरीराज सिंह यांच्या सूचनेवर मुख्यमंत्री म्हणाल्या की, त्यांनी यापूर्वी तीन वेळा पंतप्रधानांची भेट घेतली आहे आणि पुन्हा एकदा त्यांना भेटण्यासाठी वेळ मागितली आहे.

# काँग्रेस सरकार शब्द पाळणार

नवी दिल्ली : देशात नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यातील निवडणुकांमध्ये भाजपला मोठे यश मिळाले आहे. मात्र, काँग्रेसने तेलंगणात सत्तांतर घडवून सत्ता काबिज केली आहे. तेलंगणातील काँग्रेसच्या विजयाचे शिल्पकार रेवंत रेड्डी यांना मानले जाते. त्यामुळे, तेलंगणाच्या प्रमुखपदाची जबाबदारीही त्यांनाचे देण्यात येणार असल्याचे आता निश्चित झाले आहे.रेवंत रेड्डी यांनी आज राजधानी दिल्लीत येऊन काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी व प्रियंका गांधी यांची भेट घेतली. या भेटीचे फोटो शेअर करत राहुल गांधींनी स्वत: ते तेलंगणाचे भावी मुख्यमंत्री असल्याचे म्हटले आहे. काँग्रेसला चार राज्यात पराभवाचा सामना करावा लागला, पण तेलंगणात काँग्रेसने बीआरएसचा पराभवत करत सत्ता काबीज केली. या विजयात महत्वाची भूमिका बजवणा-या प्रदेशाध्यक्ष रेवंत रेड्डी यांचे नाव मुख्यमंत्रिपदासाठी निश्चित झाले आहे. शपथविधीची पूर्ण तयारी करण्यात आली असून गुरुवार ७ डिसेंबर रोजी रेड्डी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. इतर काही मंर्त्यांचाही शपथविधी होईल. तत्पूर्वी आज रेवंत रेड्डी यांनी दिल्लीत जाऊन प्रमुख काँग्रेस नेत्यांची भेट घेतली. या भेटीनंतर राहुल गांधींनी त्यांचे फोटो ट्विट करुन, तेलंगणात लवकरच काँग्रेसने दिलेल्या गॅरंटी पूर्ण करण्यात येतील, असे म्हटले आहे.हैदराबादमध्ये सीएलपीच्या बैठकीत रेवंत रेड्डींच्या नावे एकमत झाले, आता, स्वत: राहुल गांधी यांनीच रेवंत रेड्डी यांचे नाव मुख्यमंत्री म्हणून जाहीर केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, त्यांच्या नावावर आता शिक्कामोर्तब झाले आहे. दिल्लीत झालेल्या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, राष्ट्रीय सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. या बैठकीत रेवंत रेड्डी यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. दिल्लीतील भेटीनंतर रेवंत रेड्डी यांचे काँग्रेस खासदार दिपेंद्र हुडा यांनी अभिनंदन केले आहे. तसेच, संपूर्ण हरयाणाच्यावतीने मी त्यांना शुभेच्छा देतो, अभिनंदन करतो, असेही त्यांनी म्हटले. दरम्यान, सोनिया गांधींसह, राहुल गांधी व प्रियंका गांधींनीही रेवंत रेड्डी यांचे अभिनंदन केले आहे.रेवंत रेड्डींना पक्षातून विरोध रेवंत रेड्डी यांना पक्षातील काही नेत्यांच्या विरोधाचा सामना करावा लागत आहे.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE